# बृहन्मुंबई महानगरपालिका
# क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय

## जाहिरात

क्र. अतिआयुक्त / प.उप. /डी./2301 दि. 21/10/2022 अन्वये पदनाम औषध निर्माता यांची क्रांतीवीर महात्मा ज्योतीबा फुले रुग्णालय विक्रोळी (पू) येथे खालील एकूण दोन अतिरिक्त आवश्यक पदांसाठी इच्छुक उमेदवारांनाकडून दि.31/10/2022 ते 09/11/2022 पर्यत अर्ज मागविण्यास येत आहेत. अर्ज करण्यापूर्वी, संबंधित आरस्थापना कर्मचारी यांच्याशी साप्ताहीक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| पदनाम | अतिरिक्तआवश्यकपदे |
|---|---|
| **औषध निर्माता** | **2** |

कंत्राटी तत्वावर औषध निर्माता या संवर्गातील पदे भरण्याकरिता खालील प्रमाणे अर्हता प्रस्ताविण्यात येत आहेत.

### ➢ शैक्षणिक अर्हता

**1.**उमेदवाराकडे राज्यशासनाच्या तंत्रशिक्षण मंडळाची फार्मसीमधील पदविका कींवा मान्यतापात्र विद्यापिठाची फार्मसीमधील पदवी असणे आवश्यक आहे.

**2.** उमेदवार महाराष्ट्र राज्य फार्मसी काउन्सिलकडे नोंदणीकृत असावा.

**3.** उमेदवाराला संगणकाचे ज्ञान असावे.

**4.** सदर उमेदवरांना मराठी भाषेचे गरजेपुरते ज्ञान आवश्यक आहे. (वाचणे, बोलणे)

# अटी व शर्ती

**1.** उमेदवाराचे वय **38** वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**2.** सदर उमेदवारांना उपनगरीय रुग्णालयांच्या अपघात विभाग/तात्काळ सेवा विभागात चक्रांकीत पध्दतीने तिनहसत्रांत रविवार/ सार्वजनिक सुट्टी / ओ पी डी सुट्टी मध्ये काम करावे लागेल व नियमानुसार प्रशासनाने ,रुग्णालय प्रमुख यांनी मंजुर केलेल्या डयुटी लिस्ट प्रमाणे साप्ताहीक सुट्टी देय असेल.

**3.** सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्वावर तीन वर्षाच्या कालावधीकरीता प्रत्येकी **30** दिवसांनंतर एक दिवसाचा खंड देऊन प्रतिमाह **18000/-**इतक्या मानधनावर अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरूपात केली जाईल.

**4.** सदर औषध निर्मात्यांना रुग्णालयात काम करताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्य प्रणालीचे पालन करावे लागेल .

**5.** सदर पदावर नियुक्ती ही कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात केवळ तीन वर्षाकरीता असेल व तीन वर्षानंतर सदर नियुक्तीचे सर्व आदेश रद्दबातल समजण्यात येतील. (कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.)

**6.** सदर उमेदवारांना निव्वळ कंत्राटी पद्धतीने तीन वर्षापेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती केले असल्याने महानगरपालिकेच्या कोणत्याही कायमस्वरूपातील पदावरील नियुक्ती करिता हक्क अथवा प्राधान्य मागता येणार नाही तसेच हे महानगरपालिकेच्या कायमस्वरूपातील पदावरील लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाहीत किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही .

**7.** सदर कंत्राटी तत्वावरील औषध निर्माता या पदावर निवडलेल्या उमेदवारांकडून 100 रुपयांच्या बॉड पेपरवर करारनामा घेण्यात येईल(प्रतिज्ञापत्र)

**8.**सदर उमेदवारांसाठी निवास स्थानाची व्यवस्था केली जाणार नाही.

**9.**सदर उमेदवारांनी रुग्ण व त्यांचे नातेवाईक व वरिष्ठ नागरिक महापालिका वरिष्ठ कर्मचारी व महापालिका कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी त्यांचे कार्यकर्ते यांच्याशी सौजन्याने वागावे

**10.**रुग्णालय प्रमुखांच्या शिफारशीने असमाधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माआसे) यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.

**11.**औषध निर्माता या पदांची नेमणूक प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख माध्यमिक यांच्या स्वाक्षरीने निव्वळ कंत्राटी पद्धतीने तात्पूरत्या स्वरुपात करून प्रत्येक तीस दिवसांनी एक दिवस सेवा खंड देऊन तीन वर्षा करिता असेल.

**12.**सदर औषधनिर्मातांना रु. (**18000/-**मात्र प्रति माह) इतके ठोस वेतन आकारलेजाईल.

**13.**उमेदवारांविरूध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास , उमेदवारांनी त्याबाबतचा ( NOTERISED AFFIDAVIT) प्रतीज्ञापत्रक देणें आवश्यक आहे

**14.**सदर औषधनिर्मातांनी रुग्णालयात काम करताना महापालिकेच्या नियमाचे उल्लंघन केल्यास अथवा काही आक्षेपार्ह वर्तन केल्यास तसेच संबंधित विभागातील कामकाजाबाबत अकार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास अथवा रुग्णसेवेत निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ कोणत्याही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

**15.**सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्वावर तीन वर्षांच्या कालावधीकरिता असेल त्यांना महानगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

**टिप – उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र, व्यवसायियिक अर्हता, संबंधित अनुभवाचे प्रमाणपत्र , बंधपत्र पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र , इत्यादी यांच्या मुळप्रती व सांक्षाकित प्रतीसह पडताळणीसाठी रुग्णालय प्रमुखांनी दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे.**